भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०३/२०१७

**१) घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन नगदी पैसे व चांदीच्या पायपट्याची चोरी . :–**

दिनांक १५/०३/२०१७ चे १७.०० ते १६/०३/२०१७ चे ९.३० वा. दरम्यान यातील संशयीत आरोपीने सुना मौका पाहुण फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन किचन रुम मध्ये ठेवलेली १ प्लॉस्टीक सुटकेस मधील नगदी २०,०००/–रु. व १ जोड चांदीच्या पायपट्टया असा एकुण २०,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी रुपचंद कसरु बारसागडे वय ३५ वर्ष, रा. बेटाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २८/१२/२०१६ चे १७.३० ते १६/०३/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अशोक गजानन मानापुरे वय ४४ वर्ष रा. नेहरु नगर यांनी आपली हिरो पॅशन प्रो डीआरएस मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ४५४३ किंमती १३,०००/–रु. ची घरा समोर ठेवुन हाय कोर्ट कामाने नागपुर येथे गेला होता. तेथे थांबुन आज दिनांक १६/०३/२०१७ ला घरी येवुन पाहीले असता त्याची मोटार सायकल दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या लापरवाहीने मोटार सायकल चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०३/२०१७ चे १८.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजन ग्यानीराम पडारे वय ३६ वर्ष, रा. श्रीराम नगर तुमसर हा भंडारा येथुन दाभा मार्ग तुमसर येथे मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी २७२३ ने रस्त्याचे डावे बाजुने जात असता फिर्यादीचे मोटार सायकलला यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने चालवुन उजवे बाजुला वळतांनी कोणत्याही प्रकारचा हात व इंडीकेटर न देता आपली मोटार सायकल लापरवाहीने चालवुन उजव्या बाजुला वळविल्याने फिर्यादीचे मोटार सायकल धडक मारुन फिर्यादीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २२७,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) अवैध जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर येथे अवैध जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून जुगारातुन किंमती ५,०८,२७०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

PSI

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता